दि. किर.अर्ज नं.     /२०२६

# मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन, इचलकरंजी

## यांचे कोर्टात.....

**रोहीतकुमार ॲण्ड कंपनी**
**प्रोप्रा. श्री.जगदीशप्रकाश जुगलकिशोर करवा**(HUF)
व.व.६६, धंदा - व्यापार, रा.५/५९५, वेद भवन
दाते मळा, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अर्जदार**
**(मुळ प्रतिवादी)**

**विरुध्द**

**नवल विविंग वर्क्स तर्फे**
**प्रोप्रा. नवलकिशोर रामरतन खटोड**
व.व.५२, धंदा - व्यापार,
रा.५/३३८, खटोड सदन, कागवाडे मळा,
इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**वि.प.**
**(मुळ वादी)**

रु. १०/- कोर्ट फी स्टँप

**<u>स्थगिती अर्ज</u>**

**<u>यातील अर्जदार तर्फे विनंती अर्ज असा की,</u>**

ORDER
Issue Notice to the opponent on P.F.
R/o. 24.02.2026

Sd/-
4th C.J.J.D., Ichalkaranji

१. यातील वि.प. यांनी अर्जदार यांचे विरुध्द मे.सिव्हील जज्ज वरीष्ठ स्तर, इचलकरंजी (४ थे सह दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर, इचलकरंजी) यांचे न्यायालयात दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ३७ प्रमाणे रक्कम वसुलीचा समरी दिवाणी केस नं.१६/२०२४ चा दावा दाखल केला होता.

२. सदर मुळ समरी केस नं.१६/२०२४ मध्ये प्रथम ता.२२/०७/२०२४ इ. समन्स गैरलागु झाले होते. त्यानंतर शेवटी वि.प. यांनी ता.२८/०३/२०२५ इ. अर्जदार यांचे विरुध्द मुळ दावेचे समन्स दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ५ रुल २० प्रमाणे चिकटवुन लागु करणे संदर्भात अर्ज दिला व तो अर्ज मंजुर झालेनंतर अर्जदार यांना सदर दावेचे समन्स लागु केलेचे रिपोर्ट सदर समरी दावेत झालेचे दिसते. त्यानंतर समन्स लागु झालेपासुन १० दिवसाचे आत

21-1-26
Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

अर्जदार हे मा.कोर्टात हजर न राहिलेने त्यांचे विरुध्द दि.१४/०७/२०२५ इ. रोजी मा.४ थे सह दिवाणी न्यायाधिशसाो, कनिष्ठ स्तर, इचलकरंजी यांचे कोर्टाकडून एकतर्फा हुकूमनामा वि.प. यांनी मिळविला आहे.

३. समरी दिवाणी दावा नं. १६/२०२४ मध्ये अर्जदार यांना कधीही वैयक्तिक अगर त्यांचे कुटूंबातील कोणत्याही व्यक्तीस समन्स लागु झालेले नाही. तथाकथित समन्स लागु केलेचा बेलीफ यांचा ता.१०/०६/२०२५इ. चा रिपोर्ट हा वस्तुस्थितीप्रमाणे नाही. मुळातच अर्जदार यांना समरी दिवाणी दावा नं.१६/२०२४ चे समन्स यथायोग्य व वैयक्तिकरित्या लागु झाले नसलेने अर्जदार यांना दहा दिवसाचे आत वकीलांचेमार्फत मा.कोर्टात हजर राहता आले नाही.

४. समरी दिवाणी दावा क्रं. १६/२०२४ मध्ये नमुद केलेली दावा रक्कम रु.१,४१,२६९/- अगर रक्कम रु.१,०९,२२९/- ही तथाकथित रक्कम अर्जदार हे वि.प. यांना कधीही देणे लागत नव्हते व नाही. उलट वि.प. यांचेकडे अर्जदार यांचा बऱ्याच मोठ्या रक्कमेचा सुतमाल व कापडमाल शिल्लक आहे व तो व्यवहार संपुष्टात आला नसलेने व त्याबाबत अर्जदार व वि.प. यांचेत वाटाघाटी चालु असलेने त्याचा गैरफायदा घेवुन वि.प. यांनी अर्जदार यांचेविरुध्द परस्पर दावा दाखल केलेचे अर्जदार यांना समजुन आले नव्हते व नाही. रेग्युलर दर.नं.४६/२०२५ ची नोटीस लागु झालेनंतर अर्जदार यांना त्याची माहिती समजली. अशास्थितीत अर्जदार यांना समरी दावा नं.१६/२०२४ चा दावा दाखल झालेची कोणतीही माहिती नसलेने अर्जदार यांना त्याकामी हजर राहता आले नाही.

५. मुळ समरी दावा नं.१६/२०२४ मध्ये झालेल्या हुकूमनामाची अंमलबजावणी करणेकरीता वि.प. यांनी रेग्यु.दर.नं. ४६/२०२५ ची दाखल केली व त्याची नोटीस अर्जदार यांना ता. ०२/०१/२०२६ इ. आलेनंतर समजुन आले.

21-1-26
Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

६. अर्जदार हे समरी दिवाणी नं.१६/२०२४ चे कामी जाणुनबुजुन गैरहजर राहिले असे झाले नाही. वर नमुद कारणामुळे अर्जदार हे समरी दि.के.नं. १६/२०४ चे कामी हजर नसताना अर्जदार यांचे विरुध्द एकतर्फा आदेश होऊन ता.१४/०७/२०२५ इ.रोजी हुकूमनामा झालेला आहे. वास्तविक अर्जदार हे वि.प. यांनी समरी दि.दावा नं.१६/२०२४ मध्ये नमुद केलेली रक्कम कधीही कायदेशीर देणी लागत नव्हते व नाही. वि.प. यांनी चूकीची, खोटी व बेकायदेशीर रक्कमेची मागणी केली असलेने अर्जदार यांना कोणत्याही परिस्थितीत मान्य व कबुल नाही. समरी दावेमध्ये कोणताही लेखी मान्य केलेचा पुरावा, हुंडी, चेक नसलेने व केवळ बनावट व खोटे खाते उतारा, बिल व इतर कागदपत्रांवरुन फसवुन दावा एकतर्फा डिसाईड करुन घेतला आहे. अर्जदार यांना दावेत हजर होऊन लिव्ह टू डिफेंडचा अर्ज देता आला नसलेने खरी वस्तुस्थिती मा.कोर्टाचेसमोर आलेली नाही. तसेच वि.प. यांनी चुकीच्या नावावर व चूकीच्या फर्मवर दावा दाखल केलेला होता. अशास्थितीत सदरचा समरी दावेमध्ये अर्जदारांना हजर होऊन लिव्ह टू डिफेंडचा अर्ज देणेची संधी मिळाली असती तर अर्जदार यांना त्याकामी यशाची पूर्ण खात्री होती व आहे.अशास्थितीत समरी दावा ता.०१/०६/२०२४ इ.मध्ये एकतर्फा झालेला हुकूमनामा रद्द होवुन अर्जदार यांना हजर होऊन लिव्ह टू डिफेंड देणेची संधी मिळालेस वि.प. यांचे काहीही नुकसान होणार नाही. उलट न्यायादानास मदत होणार आहे व अर्जदारास त्याची बाजू मांडणेस संधी मिळणार आहे. मात्र संधी न मिळालेस अर्जदार यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे मुळ समरी दिवाणी दावा क्रं.१६/२०२४ मध्ये एकतर्फा झालेला हुकूमनामाा रद्द करणेत यावा म्हणुन सदरचा अर्ज अर्जदार यांना दाखल करणे भाग पडले आहे. त्यास दिनावधी लागण्याची शक्यता आहे. दरम्यान यातील वि.प. यांनी सदर हुकूमनामेची अंमलबजावणी करणेकरीता रे.दर.

21-1-26
Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

नं.४६/२०२५ ची दाखल करुन वसुली करु पाहत आहेत. त्यामुळे सदरची समरी दिवाणी दावा क्रं.१६/२०२४ ची अंतरीम आदेश व हुकूमनामेची बाजवणीस मुळ अर्जाच्या अंतीम निकालापावेतो स्थगिती देणेत यावी म्हणुन सदरचा अर्ज दाखल केला आहे, त्याची कारणे पुढीलप्रमाणे -

अ. यातील अर्जदार हे वि.प. यांची कोणतीही कायदेशीर रक्कम कधीही देणे लागत नव्हते व नाही. केवळ एकतर्फा हुकूमनामा झाला असलेन त्याची वसुली करणेसाठी अर्जदार यांना भाग भाडत आहेत जी अन्यायकारक आहे.

ब. अर्जदार यांना मुळ समरी दिवाणी दावा क्रं.१६/२०२४ मधील समन्स यथायोग्य व वैयक्तिकरित्या लागु झालेले नाही. त्यामुळे अर्जदार यांना मा.कोर्टात हजर राहता आले नाही व त्याचा गैरफायदा घेवुन वि.प. यांनी एकतर्फा आदेश व हुकूमनामा मिळविला आहे.

क. मुळ अर्जाचे निकालापावेतो समरी दिवाणी दावा क्रं.१६/२०२४ मधील आदेश व एकतर्फा हुकूमनामेची अंमलबजावणीस स्थगिती मिळाली तर वि.प. यांचे काही नुकसान होणार नाही. मात्र स्थगिती न मिळालेस अर्जदारांचे फार मोठे आर्थिक नुकसान होणार आहे.

ड. मुळ समरी दिवाणी दावा क्रं.१६/२०२४ मध्ये अर्जदारांना दावा गुणदोषावर चालविणेची संधी मिळाली असती तर अर्जदारांना यशाची पुर्ण खात्री होती व आहे.

इ. बॅलन्स ऑफ कन्व्हेनियन्स अर्जदार यांचे बाजुने आहे.

ई. नैसर्गिक न्याय तत्वानुसार अर्जदार यांना समरी दिवाणी दावा क्रं.१६/२०२४ मध्ये पुरावेची संधी मिळाली नसलेने व एकतर्फा हुकूमनामा झाला असलेने हुकूमनामेच्या अंमलबजावणीस स्थगिती मिळणे न्यायाचे हेतुस्तव आवश्यक आहे.

21.1.26
Superintendent
Civil Court Sr. Dn.
Ichalkaranji

३. <u>सबब अर्जदार यांची विनंती अशी की,</u>

अ. न्यायाचे हेतुस्तव सदरचा स्थगिती अर्ज मंजुर करणेत यावा.

ब. मा.४ थे सह दिवाणी न्यायाधिशसो, कनिष्ठ स्तर, इचलकरंजी यांनी समरी दिवाणी दावा क्रं.१६/२०२४ चे कामी दि.१४/०७/२०२५ इ.रोजी झालेल्या अंतिम हुकूमनामा व आदेशाच्या अंमलबजावणीस दाखल केलेल्या रे.दर.नं. ४६/२०२५ च्या बजावणीस मुळ अर्जाच्या अंतिम निकालापावेते स्थगिती देणेत यावी.

क. जरुर तर अर्ज दुरुस्त करु. तरी तशी परवानगी असावी.

ड. योग्य ती दाद व न्यायाचे सर्व हुकूम याच कामी व्हावेत.

---------- येणेप्रमाणे कारणांचा विचार होऊन सदरचा स्थगिती अर्ज मंजुर व्हावा ही नम्र विनंती. ता.२९ /०१/२०२६

**Rohitkumar And Company**
Prop.Karwa Jagdishprasad Jugalkishore(HUF)
---------------------
Proprietor / Karta

## प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार (मुळ प्रतिवादी) रोहीतकुमार अॅण्ड कंपनी तर्फे प्रोप्रा. श्री. जगदीशप्रसाद जुगलकिशोर करवा (HUF) व.व.५६, धंदा - व्यापार, रा. इचलकरंजी अशी प्रतिज्ञा करतो की, वरील अर्जातील संपुर्ण मजकुर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा सही ता. २९ /०१/२०२६

**Rohitkumar And Company**
Prop.Karwa Jagdishprasad Jugalkishore(HUF)
---------------------
Proprietor / Karta

## ॲफिडेव्हिट

देवाची शपथ घेऊन खरे सांगतो की माझे नांव श्री. जगदीशप्रसाद जुगलकिशोर करवा, व.व.५६, धंदा - व्यापार, इचलकरंजी सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट करतो की,

21.1.26
Superintendent
Civil Court Sr. Dn.

मी आजरोजी माझेविरुध्द दाखल झालेली रे.दर.नं.४६/२०२५ च्या वसुलीस स्थगिती मिळावी म्हणुन सदरचा अर्ज दिला आहे. त्या अर्जातील संपुर्ण मजकुर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केले ॲफिडेव्हिट सही ता. २९/०१/२०२६

**Rohitkumar And Company**
Prop.Karwa Jagdishprasad Jugalkishore(HUF)
------------------------
**Proprietor / Karta**

मी ॲफिडेव्हिट करणार
यांना ओळखतो.

**अशोक घ.अग्रवाल, ॲडव्होकेट**

क्र. ५/- कोर्ट फी ८८५

## प्रतिज्ञा

मी यातील ॲफिडेव्हिट करणार अशी प्रतिज्ञा करतो की, वरील ॲफिडेव्हिटमधील संपुर्ण मजकुर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा सही ता. २९ /०१/२०२६

**Rohitkumar And Company**
Prop.Karwa Jagdishprasad Jugalkishore(HUF)
------------------------
**Proprietor / Karta**

Solemnly Affirmed before me by
Shri Jagdishprasad Jugalkishor Karva
of Jugalkishor... who is
identified by Shri A. G. Agrawal
...A.G.A. whom I know personally
Dated :- 21.1.26

Superintendent
Civil Court Sr. Dn.
[illegible]